**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट दिनांक - ०७/०२/२०२३

**दि.०६/०२/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड१००/२३ भा.दं.वि ३९२,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ता.६/२/२०२३ रोजी २०:३० वा.चे सुमारास देहु ते आळंदी रोड साधुशेठ मंगलकार्यालय जवळ एच डि एफ सी बॅंकेच्या समोर |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/०२/२०२३ रोजी २२:३९ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | २ अज्ञात इसम |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व फिर्यादी यांची भावजय असे पायी चालत जात असताना एक काळे रंगाची मोटार सायकल ( नंबर माहित नाही ) वरुन दोन अज्ञात इसमांनी येवुन फिर्यादी यांचे गळयातील अंदाजे १० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन त्यामध्ये ३ ग्रॅम वजनाचे लॉकेट असे एकुण १५,०००/- रु किंचा ऐवज जबरदस्तीने हिसकावुन घेवुन फिर्यादीस धक्का देवुन पळुन गेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि दळवी मो ७५८८०२९६४४ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | देहुरोड ९७/२०२३ भा.द.वि.कलम ३५४,३५४(ड),४२७,३२३, ५०४,५०६,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/०२/२०२३ रोजी रात्रौ ०१:३० वा. चे सुमारास मुकाई चौक ईडन गार्डन सोसायटीकडे जाणा-या कच्च्या रस्त्यावर आदर्शनगर किवळे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/०२/२०२३ रोजी ०४/३१ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १)अमित गजानन वानरे वय ३२ वर्षे रा. सर्वे नं. ७३ शिवशंभो कॉलनी आदर्शनगर किवळे पुणे २) सुलतान युसुफ खान वय २७ वर्षे रा. पंडीत चाळ शिवाजी विदियालयामागे गांधीनगर देहुरोड पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या त्यांचे पतीला शोधण्यासाठी मुकाई चौक येथे जात असताना ईडन गार्डन सोसायटीकडे जाणारे कच्च्या रस्त्यावर आदर्शनगर किवळे येथे आले असता आरोपी क्र १ याने मोटरसायकलवर येवुन ए इधर आना, सुन ना, मेरे साथ चलती क्या असे बोलुन फिर्यादी यांचे स्त्री मनास लज्जा निर्माण होईल असे वर्तन करून छेड काढली. त्यावेळी फिर्यादी यांचे पती सदर ठिकाणी आले असता त्यांना आरोपी क्र १ याने हाताने मारहाण केली व फिर्यादी यांनी पोलीसांना फोन करण्यासाठी फोन काढला असता फिर्यादीचे हातातुन फोन हिसकावुन घेवुन तो रस्त्यावर आपटुन त्याचे नुकसान केले. तसेच आरोपी क्र १ याने आरोपी क्र २ यास फोन करुन बोलावुन घेवुन आरोपी क्रं २ याने फिर्यादीस "तु मुझे जानती है क्या, मै इधर का गाववाला हु , तु क्या करेगी" असे बोलुन फिर्यादीचे स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल अशा प्रकारे अश्लिल शिवीगाळ करून फिर्यादीचे पोटावर लाथ मारली आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोफौ निंबाळे ७९७२४०१०४६ |

३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | पिंपरी १६५/२०२३, भा.दं.वि. कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९ ,पोक्सो,८, १२, |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक ०२/०२/२०२३ रोजी २२/३० वा दरम्यान राहते घरी निमेष हाउसिंग सोसायटी, अजमेरा रोड,मोरवाडी पिंपरी पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/०२/२०२३ रोजी २३.३७ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी, वय १७ वर्षे |
| आरोपी | :- | उमेश (पुर्ण नाव पत्ता माहित नाही) व सोसायटीतील ३० ते ४० जण<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी त्यांचे राहते घरी त्यांचा भाउ पार्थ सोबत असताना फिर्यादी यांचे सोसायटी मध्ये वॉचमन म्हणुन काम करणारा आरोपी याने फिर्यादी यांचा डावा हात पकडला आणि, "आम्ही काय कमी पडलो होतो, तेव्हा तुझ्या भावाला बोलाविले" असे म्हणुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले त्यानंतर आरोपीने आराडा ओरडा करुन सोसायटीमधील ३० ते ४० लोक जमा करुन ते सर्व लोक फिर्यादी यांचेशी हुज्जत घालुन भांडु लागले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | म.पो उप निरी गिरी ८४४६७१४०३५ |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | वाकड ११६/२०२३ भा.द.वि.कलम ३८४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०२/०२/२०२३ रोजीचे २०:३५ वा. ते दि. ०५/०२/२०२३ रोजीचे २३.५२ दरम्यान फिर्यादी यांचे मोबाईल वर |
| गुन्हा दाखल | :- | ०६/०२/२०२३ वेळ २२.०६ वाजता |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी, वय ३२ वर्षे |
| आरोपी | :- | मोबाईल क्र. ७४८८८४२६८० यावरुन बोलणारा अनोळखी इसम |
| तपशिल | :- | वर नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना नमुद मोबाईल क्रमांक ७४८८८४२६८० यावरुन अनोळखी आरोपीने त्याच्याकडे फिर्यादी महिला यांचे डाटा व सीडीआर डाटा असल्याचे सांगुन सदरचा डाटा त्यांच्या पतीकडे व त्यांच्या नातलगांमधील दि.१०/०२/२०२३ रोजी होणा-या लग्नामध्ये स्क्रिनवर दाखवुन बदनामी करण्याची धमकी देवुन ५०,०००/- रुपये व नंतर १,००,०००/- रुपये खंडणी मागितली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | ए.पी.लोहार, सहा.पोलीस निरीक्षक ९८५०२२२१९० |

५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | पिंपरी १६२ /२०२३भा.द.वि. कलम ३८० प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०५/०२/२०२३ रोजी ०२/४५ वा. ते ०२/४८ वा. सुमारास आचार्य अत्रे सभागृह संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/०२/२०२३ रोजी १९.२० वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळ व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी त्यांचा १०,०००/- रु किं चा ओपो मोबाईल, |

५०,०००/- रु किं चे १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र व २०००/-रु रोख रक्कम असा माल फिर्यादीने त्यांच्या ताब्यातील पर्समध्ये ठेवला असता कोणितरी अज्ञात चोरटयाने आचार्य अत्रे सभागृह संत तुकारामनगर,पिंपरी,पुणे.येथुन सदर मुददेमाल असलेली पर्स चोरुन नेले.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- ए.पी.लोहार, सहा.पोलीस निरीक्षक ९८५०२२२१९०

६.

पोस्टे व गु.रजि.नं. :- सांगवी ५८/२०२३ भादवि कलम ४२० माहिती व तंत्रज्ञान कायदा कलम ६६(डी), ६६ (डी)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.३१/०१२/२०२२ रोजी पासुन ते ०२/०१/२०२३ रोजीचे दरम्यान फिर्यादीचे मोबाईल फोनवर

गुन्हा दाखल :- दि.०६/०२/२०२३ रोजी १७/३२ वा.

फिर्यादी :- शरद भीमराव पवार, वय-४९ वर्षे, धंदा नोकरी रा. द्रौपदी बिल्डींग प्लॅट नं. ३, ४४ गजानन महाराज नगर, लेन नं. १, पिंपळे गुरव पुणे

आरोपी :- एच.डी.एफ.सी बॅकेचे अकाऊंट न. ५०१००५७०६८०३४० धारक, इतर अकाऊंट धारक व अज्ञात व्यक्ती

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांच्या बँक ऑफ महाराष्ट चे अकाऊंट नं. २०१५९१२४२८८८ मधुन २,५९,८५०/- रुपये ऑनलाईन पध्दतीने फिर्यादी यांना कोणतीही माहिती, पिन नंबर, लिंक अथवा कॉल न करता/ पाठवता माझ्याशी कोणताही संपर्क न करता फिर्यादी यांना कोणतीही माहिती न विचारता फिर्यादी यांची कोणतीही परवानगी अथवा सहमती नसताना कोणाच्यातरी एच.डी.एफ.सी बॅकेचे अकाऊंट न. ५०१००५७०६८०३४०, आय.एफ.एस.सी नं.– HDFC0001741 मध्ये व इतर अकाऊन्ट मध्ये ट्रान्सफर केले आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि सुनिल टोणपे मोनं ९८२३०२७५२२

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ११९/२०२३ भा.द.वि.कलम ४२०, ४१९ व माहिती तंत्रज्ञान कायदा सन २००८ चे कलम ६६(सी)(डी)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१२/०१/२०२३ रोजी ते दि.०६/०२/२०२३ रोजी दरम्यान फिर्यादी यांचे राहते पत्यावर, ताथवडे, पुणे. याठिकाणी.

गुन्हा दाखल :- ०६/०२/२०२३ वेळ २३/३७ वाजता

फिर्यादी :- महिला फिर्यादी वय २४ वर्षे

आरोपी :- १)आकाश सिंग पुर्ण नाव-पत्ता माहित नाही, मोबाईल नंबर ९२३३२००५०७ व ८४४८९०४८१२ वर बोलणारे इसम २)अनोळखी महिला तसेच ३)प्रकाश पुर्ण नाव-पत्ता माहित नाही. **आरोपी अटक नाही**

तपशिल :- वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने फिर्यादीशी इन्स्टाग्रामवर मैत्री करुन विश्वास संपादन करुन व्हॉट्सअपवर मेसेज करुन तुझ्यासाठी पोलंडवरुन सोने व हि-याचे ज्वेलरी तसेच रोख रकमेचे पार्सल पाठविले आहे. ते कस्टममधुन सोडवुन घे असे सांगुन मोबाईल नंबर ९२३३२००५०७ व ८४४८९०४८१२ यावरील अनोळखी महिला तसेच प्रकाश पुर्ण नाव-पत्ता माहित नाही यांनी वेगवेगळ्या बँक खात्यावर सदर पार्सलची कस्टम डयुटी, हायकोर्ट, मनी लॉन्ड्रींग, पोलीस व्हेरिफिकेशन, ट्रान्सफर चार्जेस, इंन्श्योरन्स, स्टॅम्प चार्जेसच्या नावाखाली वेगवेगळ्या बँक खात्यावर एकुण ११,४९,०८०/- रुपये इतकी ऑनलाईन रक्कम भरायला भाग पाडुन कोणत्याही प्रकारचे पार्सल न देता फसवणुक केली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि लोहार ९८५०२२२१९०